महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३२१ वे | दिनांक : २२/११/२०२६ | वार : रविवार

लातूरला गरज पडल्यास पुन्हा रेल्वेने पाणी देऊ; गिरीश महाजनांचा अमित देशमुखांना पलटवार



बुलढाणा : 2016 मध्ये लातूरला रेल्वेने पाणीपुरवठा करणे हे देशमुख कुटुंबीयांना आणि दिवंगत विलासराव देशमुख यांना बदनाम करण्याचे राजकीय षड्यंत्र होते, या काँग्रेस आमदार अमित देशमुख यांच्या आरोपावर राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सणसणीत पलटवार केला आहे. "अमित देशमुख यांच्या आरोपात कोणतेही तथ्य नाही. तत्कालीन भीषण दुष्काळी परिस्थितीत माणसांचा आणि जनावरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तो निर्णय घेतला होता; यात कोणाचीही बदनामी करण्याचा हेतू नव्हता. आजही लातूरमधील परिस्थिती गंभीर असून, वेळ आली तर पुन्हा एकदा लातूरला रेल्वेने पाणीपुरवठा करण्यात येईल," असे स्पष्ट प्रत्युत्तर गिरीश महाजन यांनी शनिवारी (21 नोव्हेंबर) माध्यमांशी बोलताना दिले. यावेळी त्यांनी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीतील राजकारण आणि मंगेश चव्हाण-सुमित पाटील वादावरही रोखठोक भाष्य केले. 2016 मधील लातूरच्या जलसंकटावरून काँग्रेस आणि भाजप नेत्यांमध्ये चांगलीच जुंपली आहे. 2016 मध्ये लातूरला रेल्वेने पाणी आणण्याचा निर्णय हा राजकीय षड्यंत्राचा भाग होता आणि माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांची प्रतिमा मलिन करण्यासाठीच हे राजकारण केले गेले, असा गंभीर आरोप आमदार अमित देशमुख यांनी केला होता. त्यावेळी बीड, नांदेड आणि धाराशिव हे जिल्हेही दुष्काळाचा सामना करत असताना केवळ लातूरचीच निवड का करण्यात आली, असा सवालही त्यांनी विचारला होता. यावर प्रतिक्रिया देताना मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, "इतक्या वर्षांनंतर रेल्वेच्या पाणीपुरवठ्यावर अशी टीका-टिप्पणी करणे अमित देशमुख यांना शोभत नाही. त्यावेळी लातूरमध्ये नेमकी काय परिस्थिती होती, हे तिथल्या जनतेला विचारले पाहिजे. जनतेची आणि मुक्या जनावरांची तहान भागवण्यासाठी रेल्वेने पाणी आणण्यात गैर काय होते? सध्याही तेथील दुष्काळी परिस्थिती गंभीर असल्याने गरज पडल्यास पुन्हा रेल्वेने पाणीपुरवठा करू.“ जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीवरून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवरही गिरीश महाजन यांनी महायुतीची बाजू भक्कम असल्याचे स्पष्ट केले. जिल्हा बँक निवडणुकीत 90 टक्के मतदार हे महायुतीचेच आहेत, त्यामुळे या निवडणुकीत सर्वच 21 जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून येतील. मुक्ताईनगर आणि चाळीसगावमध्ये काहीसा तिढा असला, तरी निवडणूक होऊन लढत होऊ द्या; रिंगणात असलेल्या उमेदवारांनी जिल्हाभर फिरून मते मिळवावीत, असे ते म्हणाले. महायुतीत कुठेही वातावरण तापलेले नसून थेट लढत नसल्याने सर्वत्र शांतता आहे.

म्हशीचे दूध ६ तर गाईचे दूध ४ रुपयांनी महागले

कोल्हापूर : प्रशासकीय राजवटीत झालेला तब्बल २८ कोटी रुपयांचा तोटा भरून काढण्यासाठी आणि राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झालेली दुधाची टंचाई लक्षात घेऊन कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (गोकुळ) इतिहासात पहिल्यांदाच मोठी दूध दरवाढ जाहीर केली आहे. गोकुळने म्हशीच्या दुधाच्या विक्री दरात प्रतिलिटर ६ रुपये, तर गाईच्या दुधाच्या दरात ४ रुपयांची वाढ केली असून, हे नवे दर शनिवारपासून (२१ नोव्हेंबर २०२६) लागू झाले आहेत. गोकुळपाठोपाठ वारणा, अमूल आणि मदर डेअरीनेही दुधाचे दर वाढवल्याने सर्वसामान्य ग्राहकांचे महिन्याचे बजेट कोलमडले आहे. दुसरीकडे, या दरवाढीवर काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील यांनी पहिली प्रतिक्रिया देताना, प्रशासक काळातील २८ कोटींच्या तोट्यावर संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत सखोल चर्चा केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. बाजारपेठेतील स्पर्धक ब्रँड्सनी गेल्या ८ दिवसांपूर्वीच (११ नोव्हेंबरपासून) दरवाढ केल्याने गोकुळ व वारणा दूध संघानेही दरवाढीचा निर्णय घेतला आहे. प्रमुख दूध ब्रँड्सचे जुने आणि नवे विक्री दर (प्रतिलिटर) खालीलप्रमाणे आहेत: गोकुळचे नूतन अध्यक्ष राजेश पाटील यांनी या दरवाढीमागची कारणे स्पष्ट करताना सांगितले की, "संचालक मंडळाच्या बैठकीत सर्व २५ उपस्थित संचालकांच्या (ज्यामध्ये सत्ताधारी १२, विरोधी आघाडीचे १३ आणि शासन नियुक्त ४ संचालकांचा समावेश आहे) एकमताने हा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळात दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी म्हैस दूध खरेदी दरात प्रतिलिटर ३ रुपये आणि गाय दूध खरेदी दरात २ रुपयांची ऐतिहासिक वाढ केली आहे. गेल्या २ वर्षांत विक्री दरात कोणतीही वाढ झाली नव्हती.“ हे नवे दर २१ नोव्हेंबरपासून पुढील १३१ दिवस म्हणजेच मार्च अखेरपर्यंत लागू राहतील आणि दर महिन्याला परिस्थितीचा आढावा घेतला जाईल. तसेच, प्रशासक काळातील ६ महिन्यांत संघाला नेमका २८ कोटी रुपयांचा तोटा कशामुळे झाला, याचा सविस्तर अहवाल व्यवस्थापकीय संचालक (एमडी) आणि विभाग प्रमुखांकडून मागवण्यात आला असून, समविचारी आघाडीचे संचालक बयाजी शेळके यांनीही या प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली आहे. या दरवाढीवर भाष्य करताना आमदार सतेज पाटील म्हणाले की, "दूध उत्पादक शेतकऱ्यांना दरवाढ मिळावी हीच आमची नेहमी भूमिका राहिली आहे. मात्र, प्रशासकाच्या काळात झालेला २८ कोटी रुपयांचा तोटा हा अत्यंत गंभीर व महत्त्वाचा मुद्दा आहे. ही मोठी तूट कशी निर्माण झाली, यावर संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत सविस्तर चर्चा करावी लागेल.“ दरम्यान, एकाच वेळी ४ ते ६ रुपयांची दरवाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. "शेतकऱ्यांना केवळ ३ रुपये दरवाढ देऊन ग्राहकांच्या माथ्यावर ६ रुपयांचा बोजा टाकणे अन्यायकारक आहे. आधीच महागाईने त्रस्त असताना आता बिनदुधाचा चहा पिण्याची वेळ आली आहे," अशा संतप्त प्रतिक्रिया कोल्हापूरसह राज्यभरातील ग्राहकांनी व्यक्त केल्या असून मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून दरवाढ मागे घेण्याची मागणी केली आहे.

लग्नाचे आमिष दाखवून महिलेची १९.७३ लाखांची फसवणूक

छत्रपती संभाजीनगर : लग्नाचे आश्वासन देऊन महिलेचे वारंवार लैंगिक शोषण केल्याचा आणि अन्य दोन महिलांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या मोहम्मद माझीन याला छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी दुबईतून अटक केली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकेच्या भीतीने त्याने थेट परदेशात पलायन केले होते. मात्र, पोलिसांनी तांत्रिक तपास आणि कायदेशीर प्रक्रियेच्या माध्यमातून त्याचा माग काढत दुबईतून ताब्यात घेतले. त्यानंतर विमानाने केरळमार्गे त्याला छत्रपती संभाजीनगरात आणण्यात आले आहे. शहर पोलिसांच्या इतिहासात परदेशातून आरोपीला अटक करून आणण्याची ही पहिलीच कारवाई असल्याचे सांगितले जात आहे. मोहम्मद माझीन याच्याविरोधात सुमारे वर्षभरापूर्वी छत्रपती संभाजीनगरमधील सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्याने एका महिलेशी जवळीक निर्माण करून तिच्याशी लग्न करण्याचे आश्वासन दिल्याचा आरोप आहे. या आश्वासनाच्या आधारे त्याने संबंधित महिलेचे वारंवार लैंगिक शोषण केल्याची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली होती. महिलेचा विश्वास संपादन करून लग्नाचे आश्वासन दिले, मात्र प्रत्यक्षात त्याने लग्न केले नाही. त्यामुळे संबंधित महिलेने पोलिसांत धाव घेतली होती. केवळ एका महिलेचे लैंगिक शोषण केल्याचाच नव्हे, तर अन्य दोन महिलांची आर्थिक फसवणूक केल्याचाही आरोप मोहम्मद माझीन याच्यावर आहे. या तिन्ही महिलांकडून त्याने वेगवेगळ्या कारणांनी पैसे घेतल्याची माहिती समोर आली होती. तक्रारीनुसार, आरोपीने एकूण १९ लाख ७३ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला होता. मात्र, अटकेची शक्यता लक्षात येताच आरोपीने शहरातून पलायन केले आणि दुबई गाठली. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी परदेशात पळून गेल्याने तपाससमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. मात्र, आरोपी परदेशात असल्यामुळे पोलिसांनी त्याचा शोध घेणे थांबवले नाही. त्याच्या हालचालींची माहिती मिळवण्यासाठी तांत्रिक तपास करण्यात आला.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ नोव्हेंबर २०२६

दौलताबाद खुलताबाद महामार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई



दौलताबाद (जावेद अहमद) : दौलताबाद ते खुलत या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ वरील अतिक्रमणे हटविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. २१ नोव्हेंबर रोजी महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमणे हटविण्याची कारवाई करण्यात आली आहेमहामार्गाच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूंना प्रत्येकी १५ मीटर परिसरातील अनधिकृत बांधकामे, टपऱ्या तसेच विनापरवाना लावण्यात आलेले जाहिरात फलक हटविण्यात आले. या कारवाईसाठी दौलताबाद पोलीस ठाण्यांकडून पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून करण्यात आले.सर्वोच्च न्यायालयाच्या स्वतःहून दाखल करून घेतलेल्या रिट याचिका क्रमांक ९/२०२५ मधील आदेशानुसार तसेच यापूर्वी २० ऑगस्ट २०२६ रोजी अतिक्रमणधारकांना बजावण्यात आलेल्या नोटिसांच्या आधारे ही मोहीम राबविण्यात येत आहे.दौलताबाद परिसर हा ऐतिहासिक पर्यटनस्थळ असल्याने येथे पर्यटक आणि भाविकांची नेहमीच मोठी वर्दळ असते. महामार्गावरील अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असून, ही कारवाई पूर्ण झाल्यानंतर दौलताबाद ते खुलताबाद मार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.दरम्यान, संबंधित अतिक्रमणधारकांनी प्रशासनाच्या कारवाईपूर्वी स्वतःहून अतिक्रमणे, साहित्य व जाहिरात फलक काढताना दिसून आले सहाय्यक अभियंता श्रेणी १, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, सां.बा विभाग परिसर पदमपुरा यांचे उपअभियंता पुष्पा खरे ,अविनाश खरात,विवेक उदमले कार्यकारी अभियंता व महाजन मॅडम यांनी केली आहे

जागतिक मधुमेह दिनानिमित्त अतनूर येथे आरोग्य जनजागृती सप्ताह कार्यक्रम उत्साहात संपन्न

अतनूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) : येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, जन आरोग्य रुग्ण कल्याण समिती, जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (अतनूर), ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था समिती (महाराष्ट्र राज्य), तसेच साई हॉस्पिटल आणि उदयगिरी मल्टी स्पेशालिटी व अपघात हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ जागतिक मधुमेह दिनानिमित्त अतनूर येथे सप्ताहाचे भव्य जनजागृती व आरोग्य मार्गदर्शन सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.गेल्या एक वर्षापासून या संस्थांच्या माध्यमातून जळकोट तालुक्यातील अतनूर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या २८ गावांतील ३२ हजार नागरिकांना आणि पंचायत समिती गणातील १७ गावे, वाडी, तांडा व अतिदुर्गम आदिवासी भागांतील लोकांना अखंडित आरोग्यसेवा व मार्गदर्शन शिबिरे दिली जात आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून २१ नोव्हेंबर रोजी शनिवारी सकाळी आरोग्य केंद्रात या विशेष सप्ताहाचा समारोप व मार्गदर्शन सोहळा उत्साहात पार पडला.तज्ज्ञ डॉक्टरांचे बहुमूल्य मार्गदर्शनया शिबिरामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जळकोट तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय पवार, साई हॉस्पिटलचे संस्थापक संचालक व प्रसिद्ध लॅप्रोस्कोपी सर्जन तथा कोरोना काळातील 'आरोग्य देवदूत' डॉ. माधव चंबुले, प्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ. लक्ष्मण ढोकाडे आणि डॉ. रमन रेड्डी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. सकलेन शेख व डॉ. भक्ती कोल्हे यांनी ग्रामस्थांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना वैद्यकीय अधिकारी डॉ. सकलेन शेख यांनी मधुमेह म्हणजे काय, त्याचे प्रकार, भारतातील मधुमेहाचे वाढते प्रमाण, प्राथमिक लक्षणे, निदान आणि आधुनिक उपचार पद्धती यावर सविस्तर प्रकाश टाकला. मधुमेहावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, गोड व तळलेल्या पदार्थांवर नियंत्रण आणि रक्तातील साखरेची वेळोवेळी तपासणी करणे किती आवश्यक आहे, हे त्यांनी सोप्या भाषेत पटवून दिले. तसेच, मधुमेही रुग्णांनी कोणती फळे व किती प्रमाणात खावीत, याबाबतही मोलाचे आहारविषयक सल्ले दिले.प्रमुख पाहुण्यांचे मनोगतयाप्रसंगी मान्यवरांनी ग्रामीण व डोंगरी भागातील आरोग्य सक्षमीकरणावर भर दिला. वैद्यकीय अधिकारी डॉ.सकलेन शेख यांनी मार्गदर्शनादरम्यान व तज्ज्ञांनी सांगितले की, "मधुमेह हा आजार मुख्यत्वे बदलत्या जीवनशैलीशी निगडित आहे. कोणतीही लक्षणे अंगावर न काढता वेळेवर निदान आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित औषधोपचार घेतल्यास मधुमेह पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येतो. ग्रामीण व दुर्गम भागातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवणे, हेच या उपक्रमाचे मुख्य ध्येय आहे." उपस्थित मान्यवरांनी सर्व आयोजक संस्थांच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातही असेच लोकोपयोगी उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी संवादात्मक प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले, ज्यामध्ये ग्रामस्थांनी आपल्या आरोग्याविषयीच्या शंकांचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ५ उपकेंद्रांचे समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), एएनएम (ANM), जीएनएम (GNM), मानसेवी आरोग्यमित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, जन आरोग्य रुग्ण कल्याण समितीचे अशासकीय सदस्य बी. जी. शिंदे, सर्व आरोग्य सेवक, अधिपरिचारिका, आरोग्य सहाय्यक, आशा कार्यकर्त्या व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या शिबिराला रुग्ण आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आ. संजय बनसोडे यांना 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' जाहीर; माजी सरपंच चंद्रशेखर पाटील यांच्या हस्ते सत्कार



अतनूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) : माजी मंत्री तथा उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संजय बनसोडे यांना सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबई येथील 'साईदिशा प्रतिष्ठान'च्या वतीने प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' जाहीर झाला आहे. या सन्मानाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हास्तरीय आरोग्य आर्थिक कमिटीचे अशासकीय सदस्य तथा अतनूरचे लोकप्रिय माजी सरपंच चंद्रशेखर अशोकराव पाटील यांनी आमदार बनसोडे यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आमदार संजय बनसोडे यांनी सदैव पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय पातळीवर साईदिशा प्रतिष्ठानने त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच मतदारसंघातील कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी बोलताना माजी सरपंच चंद्रशेखर पाटील म्हणाले की, "आमदार संजय बनसोडे यांनी आपल्या कार्यकाळात मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे खेचून आणली आहेत. सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेला नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना मिळालेला 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार' हा संपूर्ण उदगीर-जळकोट मतदारसंघाचा गौरव आहे."या सत्कार प्रसंगी परिसरातील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनीही आमदार बनसोडे यांचे अभिनंदन करून आनंद व्यक्त केला.

दौलताबाद अब्दीमंडी परिसरात पुन्हा बिबट्याचा वावर वन्यजीव पथक व वनविभागाच्या अधिकारी यांनी पाहणी केली



दौलताबाद (जावेद अहमद) : अब्दीमंडी येथील डोंगराजवळ दि १९ रोजी रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास एक युवक टेम्पो घेऊन जात असताना त्याला तीन बिबटे बसलेले दिसून आले होते त्या युवकाने ही माहिती वनविभागाला दिली असता दि २१ नोव्हेंबर रोजी मानद जीवरक्षक आशिष जोशी, भाग्यश्री वनरक्षक, वनपाल मनोज उदार यांनी दि २१ नोव्हेंबर रोजी अब्दीमंडी येथे बिबट्या असलेल्या क्षेत्रात जाऊन पाहनी केली सदर ठिकाणी बिबट्या चे वावर असल्याचे नाकारता येत नसल्याचे पथकाचे पाहणी केली आहे गेल्या पाच-सहा महिन्यांपासून या भागात बिबट्याचा वावर असल्याचे समोर येत आहे.१२ जुलै रोजी दौलताबाद किल्ल्यात बिबट्याच्या एका बछड्याची सुरक्षित सुटका करण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा बिबट्याचा वावर आढळून आल्याने वन विभागासमोर त्याच्या हालचालींचा शोध घेण्याचे आव्हान उभे राहिले आहे. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी वन विभागाकडून थर्मल ड्रोनच्या द्वारे पाहणी सुद्धा करण्यात येऊ शकतेदौलताबाद किल्ला व अब्दीमंडी भागात मोठ्या प्रमाणात जंगल असल्याने आणि वन्यप्राण्यांना लपण्यासाठी नैसर्गिक जागा उपलब्ध आहेत. परिसरात माकडे, मोर, रानडुक्कर,डुकरे आणि ससे यांसारखे वन्यप्राणी सावज असल्याने बिबट्याला खाद्य उपलब्ध होण्याची शक्यता आहे.किल्ला परिसर व जंगलात बिबट्याचा वावर लक्षात घेता पर्यटकांनी सतर्क राहावे, लहान मुलांची व लहान पाळीव प्राण्यांची काळजी घ्यावी आणि निर्जन तसेच दाट झाडीच्या भागात एकट्याने जाणे टाळावे, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ नोव्हेंबर २०२६

उच्च न्यायालयाने राज्य शासनासह गडचिरोली जिल्हा परिषदेला बजावली नोटीस



नागपूर (चक्रधर मेश्राम) : गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील भाकरोंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. संयुक्ता प्रभाकर निमजे यांच्या सेवा समाप्तीच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य शासनासह संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.यात गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ प्रताप शिंदे यांचा समावेश आहे. या प्रकरणा निमित्ताने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ प्रताप शिंदे यांच्या कार्यकाळात झालेल्या प्रतापांच्या विविध विषयांवर कहाण्या सतत वाचकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.डॉ. निमजे या भाकरोंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. मात्र, जिल्हा परिषद गडचिरोलीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी २४ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांच्या सेवा समाप्तीचा आदेश पारित केला होता. सदर आदेश मनमानी, अन्यायकारक आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन करणारा असल्याचा दावा करत डॉ. निमजे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केली आहे. त्यांनी दाखल केलेल्या याचिकेत असे नमूद करण्यात आले आहे की, डॉ. निमजे यांच्याविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपांच्या अनुषंगाने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यावर त्यांनी स्पष्टीकरणही सादर केले होते. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्पष्टीकरणाचा योग्य विचार न करता सेवा समाप्तीचा निर्णय घेण्यात आला. तसेच, गडचिरोली सारख्या दुर्गम व आदिवासी बहुल जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असतांना त्यांच्या सेवासमाप्तीमुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यसेवेवर होणाऱ्या परिणामांचाही विचार करण्यात आलेला नाही, असा मुद्दा याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.सदर याचिकेवर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी न्यायमूर्ती अनिल एल. पानसरे आणि न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणीनंतर उच्च न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस जारी करून उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.डॉ. निमजे यांनी सेवासमाप्तीचा आदेश रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घेण्याची तसेच सेवासातत्यासह संबंधित लाभ देण्याची मागणी याचिकेत केली आहे.याचिकाकर्त्या डॉ. संयुक्ता निमजे यांच्या वतीने ॲड. बोधी रामटेके यांनी उच्च न्यायालयात बाजू मांडली.

कृष्णा मराठवाडा प्रकल्पातील कलदेव निंबाळा येथील साठवण तलावांचे काम तातडीने सुरू करा

कलदेव लिंबाळा (प्रा. नागसेन कांबळे) : येथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी नुकसानभरपाई आणि रब्बीसाठी आर्थिक मदत देण्यासाठी सुनीता पावशेरे यांनी नुकतीच राज्यपालांकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे.कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत कलदेव निंबाळा शिवारात प्रस्तावित असलेल्या साठवण तलावांचे काम तातडीने सुरू करून परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा. तसेच यंदाच्या दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सर्व पिकांसाठी हेक्टरी नुकसानभरपाई, रब्बी हंगामासाठी आर्थिक मदत व शेती अवजारे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी ग्रामपंचायत गटनेत्या तथा राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष सौ. सुनिता देविदास पावशेरे यांनी राज्यपाल महामहीम श्री. जिष्णु देव वर्मा यांच्याकडे 101 महिला शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्यासह निवेदनाद्वारे केली. (दि. १९ नोव्हेंबर) बलसूर येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी व शेतकरी संवाद बैठकीदरम्यान त्यांनी हे निवेदन सादर केले.कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत २.२४ टीएमसी पाणी तुळजापूर, लोहारा व उमरगा तालुक्यांतील प्रस्तावित साठवण तलावांमध्ये आणून सोडण्याचे नियोजन आहे. याच प्रकल्पांतर्गत कलदेव निंबाळा शिवारातही अनेक वर्षांपासून साठवण तलाव प्रस्तावित आहेत. या कामाची प्रक्रिया यापूर्वी निविदा स्तरापर्यंत पोहोचली होती. मात्र, अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे या प्रलंबित कामाला गती देऊन तातडीने अंमलबजावणी करावी, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.या प्रश्नासाठी पावशेरे यांनी यापूर्वी ग्रामसभा ठरावासह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जलसंपदामंत्री तसेच जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला आहे. अनेकदा मागणी करूनही कामाला सुरुवात झालेली नसल्याने हा प्रश्न पुन्हा राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिल्याचे त्यांनी सांगितले.यंदाच्या अत्यल्प पावसामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शासनाकडून केवळ पाच हजार रुपयांची अग्रीम मदत मिळाली असून, प्रामुख्याने सोयाबीन पिकांचेच पंचनामे करण्यात आले आहेत. मात्र, ऊस, फळबागा, कांदा यांसह इतर सर्व पिकांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे सर्व बाधित पिकांसाठी हेक्टरी नुकसानभरपाई व विशेष दुष्काळी मदत तातडीने द्यावी. तसेच रब्बी हंगामासाठी आर्थिक सहाय्य, शेती अवजारे उपलब्ध करून द्यावीत आणि जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर सुरू करावीत, अशा मागण्याही निवेदनात करण्यात आल्या आहेत.राज्यपाल महामहीम यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी व मागण्या जाणून घेत संबंधित प्रश्नांवर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक मार्गदर्शन व कार्यवाहीचे आश्वासन दिले.यावेळी आमदार प्रवीण स्वामी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश दाजी बिराजदार, सभापती आकांक्षा चौगुले, उमरगा नगराध्यक्ष किरण गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य सौ. सविता बिराजदार यांच्यासह अपर जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, उमरगा व लोहारा येथील तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी, बलसूर व कलदेव निंबाळा येथील महिला शेतकरी तसेच परिसरातील विविध गावांचे शेतकरी उपस्थित होते.

“अंगत पंगत” बालकवितासंग्रहाचे प्रकाशन



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच तुळशी विवाहारंभ आणि प्रबोधिनी भागवत एकादशीच्या निमित्ताने राणाजी हॉल सिडको एन-८ येथे प्रसिद्ध बालसाहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा बालकांच्या भाविश्वाला आनंद देणारा अतिशय दर्जेदार व आशयघन बालकविता संग्रह " अंगत पंगत " या संग्रहाचे प्रकाशन दि. 21 डिसेंबर 2026 रोजी शनिवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अभ्यास मंडळाचे अध्यक्ष माननीय डॉ. सर्जेराव जिगेसर, तसेच तिफन वाचक चळवळीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजीराव हुसेसर यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सुनील डोके, डॉ. प्रमोद कुमावत, कवी मनोज खुटे, अशोक शेवगण, आणि कवियत्री माधुरी चौधरी, ज्योती सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाला कवी संदीप ढाकणे,डॉ. अर्चना सोनवणे-काटे, गझलकार गिरीश जोशी, डॉ.हबीब भंडारे, आणि जिल्हा परिषदेच्या शाळेतील उपक्रमशील शिक्षिका कस्तुरी कुलकर्णी-जोशी हे प्रकाशन कार्यक्रमाला आवर्जून हजर होते.



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ नोव्हेंबर २०२६

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

मुरूम येथील माधवराव पाटील फार्मसी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात



मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : फार्मसी क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या विस्तीर्ण संधी उपलब्ध असून, सामाजिक भान राखून व जबाबदारीने काम करण्याची गरज आहे. औषध निर्मिती क्षेत्रात सतत नवे तंत्रज्ञान आणि संशोधनाशी जोडून राहावे. कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि रुग्णसेवा ही मूल्ये जपल्यास यश निश्चित मिळते; त्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःचे करिअर स्वतः निवडून यश संपादन करावे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त विभागीय व्यवस्थापक डॉ. शिवाजीराव शिंदे यांनी केले.येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये आयोजित प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात शुक्रवारी (ता. २०) ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, प्रा. डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. डॉ. सुजित मटकरी, प्रा. प्रियांका काजळे, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. सरस्वती शेवाळकर, प्रा. सुदीप ढंगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. महेश मोटे यांनी विद्यार्थ्यांना 'अभ्यासासोबतच उत्तम माणूस घडवा', असा मौलिक संदेश दिला. तर 'कठोर परिश्रम हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे,' असे मत डॉ. रवींद्र आळंगे यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. बिराजदार म्हणाले की, भविष्यात तुम्ही मोठे संशोधक, यशस्वी उद्योजक किंवा नावाजलेले फार्मसिस्ट व्हाल; तेव्हा तुमच्या यशात या महाविद्यालयाचा सहभाग असेल, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटेल.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. हर्षद बदोले, किशोर कारभारी, नितीन कंटेकुरे यांनी विशेष पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश्वर होगाडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सना जमादार तर आभार प्रा. योगेश पाटील यांनी मानले. समारंभास विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१०. विजयश्री



सारसनगरच्या सैनिकांना रूपलनगरच्या सैनिकांचा काही अन्दाज येत नव्हता, कोठे लपले आहेत. पण समीर काही बेसावध राहिला नाही. त्याने आपल्या राखीव ठेवलेल्या कुत्र्यांची तुकडी बाहेर काढली. त्या कुत्र्यांना अरण्यात सोडले. पण व्यर्थ, आता रूपलनगरचे सैनिक सावध असल्याने त्यांनी कुत्र्यांना पिटाळून लावले व आपली जागाही बदलली. जेथे कुत्र्यांचा आवाज आला तेथे समीरने हल्ला केला पण फारसा उपयोग झाला नाही. आता समोरासमोर लढाई करायला हवी, मग समीरने आपल्या सैनिकांना सर्व परिसरास वेढा देण्यास सांगितले व 'जोपर्यन्त उजाडत नाही तोपर्यंत हल्ला करू नका, जेव्हा शत्रू दिसेल त्यावेळी लगेच हल्ला करा.' असे आदेश दिले. समीरने नदीपलीकडची तुकडीही वेढा घालण्यासाठी बोलाविली. रूपलनगरचे सैनिक अगदी शान्त, कोणतीही हालचाल न करता झाडावर लपून बसले होते. सारसनगरच्या सैनिकांना ते दिसतच नव्हते, त्यांना शोधण्यासाठी जो कोणी अरण्यात आत शिरत असे त्याला लगेच बाण मारला जात असे. असेच दोन दिवस गेले. दरम्यान चन्द्रवल्लभने शर्थीचे प्रयत्न करून लागलेली आग विझवली. रूपलनगरच्या सैनिकांना पाणी मिळाले नाही, कि खायला काही विशेष मिळाले नाही. नदीवर पाणी आणण्यासाठी जाणे शक्य नव्हते कारण वेढा पडला होता. रूपलनगरच्या सैनिकांच्या अंगात आता लढण्याचे त्राण शिल्लक राहिले नाहीत. समीरच्या हे लक्षात आले, त्याने आता हल्ला करण्याचे ठरविले. सारसनगरच्या हल्ल्याचा थोडा प्रतिकार रूपलनगरने केला, पण त्यात बरेच सैनिक मारले गेले. जे थोडे शिल्लक राहिले त्यांनी शरणागती पत्करली. कारण त्यांचा सेनापती चक्रधर हा आता पळून गेला होता. सेनापती चक्रधरला वाटले होते, आपण सारसनगरशी समोरासमोर खुल्या मैदानावर लढाई करू, लढाईची काय योजना आखली होती, काय तयारी केली होती आणि कशामुळे पराभव स्वीकारावा लागला, त्यांना अशा प्रकारच्या हल्ल्याची अपेक्षाच नव्हती, त्यामुळे त्यांनी अशी काहीच तयारी केली नव्हती.

आता समीरने सर्व रूपलनगरच्या सैनिकांना बन्दी बनविले. सर्व हत्ती, घोडे, शस्त्रे ताब्यात घेतले. जे घोडे ताब्यात घेतले त्यात एक पंचकल्याणी घोडा होता तो चन्दवल्लभने घेतला. दुसरा एक अबलख घोडा होता तो समीरने घेतला. याशिवाय म्हणजे रूपलनगरच्या काही चौक्याही ताब्यात घेतल्या, त्यामुळे रूपलनगरचा काही भूभागही सारसनगरच्या ताब्यात आला.

एक घोडेस्वार सारसनगरच्या विजयाची बातमी घेवून पुढे गेला. महाराज सूर्यसेन यांचा जीवभाण्ड्यात पडला. राज्यावर आलेले एक मोठे अरिष्ट टळले होते. हि आनन्दाची बातमी सर्व सारसनगर राज्यात वाऱ्यासारखी पसरली आणि सगळीकडे आनन्दोत्सव सुरु झाला. समीर आणि चन्द्रवल्लभ आपापल्या अबलख आणि पंचकल्याणी घोड्यावर स्वार होऊन आपल्या विजयी सेनेसह सारसनगरात प्रवेश करताच त्यांचे वेशीवरच भव्य स्वागत झाले. वेशीवर त्यांच्या स्वागतासाठी स्वतः सेनापती धैर्यधर हजर होता. त्याने विजयमाला दोघांच्याही गळ्यात घातली. त्यांच्या मागे उभा असलेला अनयकुमार हा टाळ्या वाजवत होता. बांगडी विकायला जाताना ज्या द्वारपालाला समीर सलाम ठोकत होता तोच द्वारपाल आज त्याला समाल करून मानवन्दना देत होता. जो सुभेदार विकर्ण समीरला व चन्द्रवल्लभला हत्ती, घोड्यांची लीद उचलायचे काम देवू पहात होता तोच आता सेनापती धैर्यधर यांच्या मागे उभे राहून टाळ्या वाजवून जल्लोषात स्वागत करत होता. समीरने सर्व सैनिक छावणीत विश्रान्तीसाठी पाठवून दिले. धैर्यधरने लढाईतील सर्व सैनिकांना एक सप्तहाचा अवकाश जाहिर केला. वेशीपासून ते राजप्रसादापर्यन्तच्या रस्त्यावर नागरिकांनी सडासंमार्जन करून रांगोळ्या काढल्या होत्या. त्या रस्त्यावरून समीर व चन्द्रवल्लभ जात होते त्यावेळी जनता दोन्ही बाजूला उभे राहून त्यांच्यावर जयघोष करत पुष्पवृष्टी करत होती. हा सर्व जल्लोष राजकुमारी सुगन्धा व रजनी राजप्रासादाच्या खिडकीतून पहात होत्या. रजनी सुगन्धाला म्हणाली, "अगं तो जो अबलख घोड्यावरचा मुलगा आहे ना ? तो तर आपला बांगडीवाला दिसतोय. बघ बरं जरा..." "अगं खरंच की आणि त्यानी रूपलनगरचा पाडाव केला ? बांगडी विकता विकता तो तलवार केव्हापासून चालवायला शिकला ? मोठा शुरवीरच दिसतो आहे..." सुगन्धा. बघता बघता समीर, चन्द्रवल्लभ, सेनापती धैर्यधर, सुभेदार विकर्ण आणि इतर सर्व सैन्याधीकारी यांनी राजप्रसादात प्रवेश केला. ज्या प्रवेशद्वारातून समीरला पिटाळून लावले होते त्याच प्रवेशद्वारात तोच द्वारपाल तुतारी वाजवून स्वागत करत होता. ढोल, नगारे तुतारया यांच्या आवाजाने सर्व आसमन्त दणाणून सोडला. सुगन्धा व रजनी धावत धावत राजदरबाराच्या झरोक्यापाशी पोहोचल्या. राजदरबारात समीर व चन्द्रवल्लभ जेव्हा पोहोचले त्यावेळी महाराज सुर्यसेन यांनी स्वतः उठून या दोन विजयीवीराचे स्वागत केले. त्या दोघांसाठी दरबारात खास आसन व्यवस्था केली होती. महाराज सुर्यसेन यांनी या दोघांसाठी विशेष सत्कार सोहळा आयोजित केला होता. सुर्यसेन महाराजांनी समीरला तीन चान्दाचा सुभेदार केला, तर चन्द्रवल्लभ दोन चान्दाचा सुभेदार झाला. आता दोघांच्या डोक्यावर फेटे नव्हते तर पगड्या होत्या आणि त्या पगडीवर तीन व दोन चंद्र होते. सुभेदार विकर्ण हा केवळ एक चान्दाचा सुभेदार होता. हा सर्व सत्कार समारम्भ महाराणी सुदेष्णा, राजकुमारी सुगन्धा रजनी आपापल्या झरोक्यातून पहात होत्या. सुगन्धाला तर अजूनही विश्वासच बसत नव्हता की हा तीन चान्दाचा सुभेदार म्हणजे तो बांगडीवाला आहे. पण सुगन्धाच्या लक्षात आले की हा पराक्रमी तरुण आहे. समीरचे आत्मविश्वासपूर्ण बोलणे, वावरणे सुगन्धाला आवडू लागले. रजनीने हळूच दासी इरावतीला जवळ बोलावले आणि विचारले की तो समीरकुमारच्या शेजारी बसलेला कोण आहे. ती उत्तरली - "तो चन्द्रवल्लभ आहे, तो आणि समीर चांगले मित्र आहेत. दोघेही भाग्यनगरचे आहेत." मजबूत शरीर यष्टी व करारी आवाज यामुळे चन्द्रवल्लभ सर्व राजदरबारात उठून दिसत होता. राजदारबारात सर्वत्र आनन्दाचे उत्साहाचे वातावरण होते. पण या सगळ्या उत्सवाच्या धामधूमीत समीरला तोच पैंजणाचा आवाज ऐकू येऊ लागला आणि तोच सुगन्धही येऊ लागला, जो राजकुमारी सुगन्धाला भेटला होता त्यावेळी आला होता. त्याच्या लक्षात आले राजकुमारी सुगन्धा येथेच जवळपास आहे. तो सगळीकडे नजरेने सुगन्धाला शोधू लागला. पण छे ! त्याला राजकुमारी दिसलीच नाही. जसे सोनचाफा कितीही लपवून ठेवला तरीही त्याचा सुगन्ध दरवळतोच, तसेच रूपवान राजकुमारीचे अस्तीत्व एवढ्या मोठ्या राजदरबारात समीरला जाणवत होतेच. सुगन्धामुळेच चाफ्याला जसे शोधून काढता येते, त्याचप्रमाणे समीरने राजकुमारीला तिच्या सौंदर्यामुळे शोधून काढलेच. एका उंच झरोक्यातून समीरला एकटक बघत असलेली राजकुमारी सुगन्धा दिसलीच. लगेच त्याने चन्द्रवल्लभला डोळ्याने इशारा केला. चन्द्रवल्लभने त्या झरोक्याकडे बघितले तर राजकुमारी आणि तिच्या शेजारी बसलेली गोरीपान लांबसडक केस असलेली रजनीही दिसली. लगेच चन्द्रवल्लभने समीरला विचारले, "सम्या राजकुमारी शेजारी बसलेली ती कोण सुन्दर मुलगी आहे ?" "चंद्या, अरे ती रजनी आहे, तिनेच मला राजकुमारीकडे नेले होते." - समीर. त्या रात्री राजप्रासादातच नव्हे तर सम्पूर्ण सारसनगर राज्यात कोणीही झोपले नाही. सर्वत्र जल्लोषच चालू होता. नृत्य व गायन चालूच होते. राजप्रासादातील एका भव्य व सुसज्ज अशा कक्षात समीर व चन्द्रवल्लभ यांच्या विश्रान्तीची व्यवस्था केली होती. महाराज सूर्यसेन हे पहाटे पहाटे आपल्या कक्षात झोपण्यासाठी गेले. त्यांना बऱ्याच दिवसांनी शान्त व गाढ झोप लागली.

(क्रमशः)



अनिकेत भालेराव
भ्रमणध्वनी : ९४२२५०४६०८

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ नोव्हेंबर २०२६

कर्ता पुरुष

पुरुष असतो कुटुंबासाठी,
संकटात उभारी देणारा.
स्वतःचे सुखदुःख विसरून,
प्रत्येकाची काळजी घेणारा. १

प्रत्येकाच्या सुखासाठी,
वेळोवेळी धावणारा.
संकटकाळात देवासारखा,
सदा सर्वांना पावणारा. २

पुरुष असतो लढवय्या,
संकटांना पुरून उरणारा,
कुटुंबाच्या कल्याणासाठी,
प्रत्येक संकटांशी भिडणारा. ३

डोळ्यातले अश्रू दाबून ठेवून,
संसाराचा गाडा हाकणारा,
सदा कुटुंबाच्या सुखासाठी,
श्वास असेपर्यंत राबणारा. ४

पुरुष असतोच कणखर,
दुःखापुढे कधी न वाकणारा.
कुटुंबासाठी कष्ट करतांना,
कधीच पाट्या न टाकणारा. ५

पुरुष असतो की शूरवीर,
जबाबदारीला जागणारा.
केलेल्या कष्टाचे दाम,
कोणालाही न मागणारा. ६



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

कन्नडचा कुणबी नोंदी पुनर्तपासणीचा 'पॅटर्न' राज्यात ठरला पथदर्शी



कन्नड (अरुण थोरात) : मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान कुणबी नोंदींच्या शोधाला नवी दिशा देणारा कन्नड पॅटर्न सध्या संपूर्ण महाराष्ट्रात पथदर्शी ठरला आहे. न्यायमूर्ती संदिप शिंदे समितीच्या माध्यमातून राज्यभर कुणबी नोंदी शोधण्याची मोहीम राबविण्यात आली. त्यावेळी सापडलेल्या नोंदी ऑनलाइन करण्यात आल्या. सर्व रेकॉर्ड तपासणीचे काम पूर्ण झाल्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर कन्नड येथे झालेल्या पुनर्तपासणीत अवघ्या दोन दिवसांत शेकडो नोंदी आढळल्या. मनोज जरांगे पाटील यांच्या सप्टेंबर महिन्यातील उपोषणादरम्यान कन्नड तालुक्यात सुमारे तिनशे कुणबी नोंदी शोधण्यात आल्या होत्या. या मोहिमेत अभ्यासक प्रा. चंद्रशेखर शिंदे (नाचनवेल) पोपटराव ठोंबरे पाटील (वैजापुर)यांनी पुढाकार घेतला. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सचिवांच्या विशेष आदेशाने कन्नड येथील भूमी अभिलेख कार्यालयातील जुन्या दस्तांची पुनर्तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये अवघ्या दोन दिवसांत शेकडो नोंदी आढळून आल्या. अभ्यासकांनी या पुनर्तपासणीचा अनुभव मनोज जरांगे पाटील यांना सांगितला . कन्नडप्रमाणेच राज्यातील इतर तालुक्यांमध्येही जुन्या दस्तांची पुनर्तपासणी केल्यास मोठ्या प्रमाणात कुणबी नोंदी मिळू शकतात, असे अभ्यासकांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर जरांगे पाटील यांनी पाटोदा येथे उपोषण सोडताना संपूर्ण महाराष्ट्रात कुणबी नोंदी शोधण्याची मोहीम पुन्हा सुरू करण्याची मागणी शासनाकडे केली. या मोहिमेत मराठा अभ्यासक, मोडी लिपी वाचक, उर्दू व फारसी भाषेचे जाणकार तसेच वंशावळ जुळविणाऱ्या तज्ज्ञांचा सहभाग असावा, अशी मागणीही त्यांनी केली होती.शासनाने ही मागणी मान्य करून 12 नोव्हेंबरपासून कुणबी नोंदी पुनर्तपासणी मोहीम सुरू केली आहे. यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये एकूण 63 मराठा अभ्यासक, मोडी लिपी वाचक, उर्दू व फारसी भाषेचे जाणकार आणि वंशावळ जुळविणारे तज्ज्ञ यांचा समावेश आहे. सुरुवातीला संपूर्ण मराठवाड्यात ही समिती सक्रिय झाली असून मोठ्या प्रमाणावर जुन्या अभिलेखांमधील कुणबी नोंदी शोधण्याचे काम सुरू आहे. मराठवाड्यानंतर राज्यातील इतर विभागांतही ही समिती कार्यरत झाली आहे.सन 2023 मध्ये न्यायमूर्ती शिंदे समितीने कुणबी नोंदी शोधण्याचे काम हाती घेतले होते. मात्र, मोडी, उर्दू व फारसी लिपी वाचणाऱ्या जाणकारांचे अपुरे मनुष्यबळ आणि मर्यादित कालावधी यामुळे अनेक ठिकाणच्या जुन्या दस्तांमधील नोंदी तपासणीविना राहिल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. असे असतानाही प्रशासनाने तपासणी पूर्ण झाल्याचा अहवाल शासनाला सादर केला होता. कन्नडमधील पुनर्तपासणीत समोर आलेल्या नोंदींमुळे या प्रक्रियेतील त्रुटींची चर्चा सुरू झाली आहे. आता तज्ज्ञांच्या सहभागातून होत असलेल्या पुनर्तपासणीमुळे कुणबी-मराठा समाजातील पात्र व्यक्तींना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. या कार्यासाठी अहोरात्र झटणारे अभ्यासक प्रा. चंद्रशेखर शिंदे (नाचनवेल), अभ्यासक पोपटराव ठोंबरे पाटील (वैजापूर), हैदराबाद गॅझेटियरचे अभ्यासक डॉ. रमेश सूर्यवंशी, मोडी लिपी वाचक अरुण थोरात कळंकीकर आणि उर्दू व फारसी भाषेचे जाणकार रहीम खान (छत्रपती संभाजीनगर) यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कन्नड येथे जुन्या दस्तांची पुनर्तपासणी करण्यासाठी अभ्यासकांनी घेतलेला पुढाकार आणि त्यातून राज्यस्तरावर सुरू झालेली पुनर्तपासणी मोहीम ही या प्रक्रियेतील महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. एका तालुक्यातील प्रयत्नातून राज्यव्यापी मोहिमेला चालना मिळाल्याने 'कुणबी नोंदी पुनर्तपासणीचा कन्नड पॅटर्न' आता संपूर्ण महाराष्ट्रासाठी चर्चेचा विषय ठरत आहे.अभ्यासकांच्या प्रतिक्रिया"मी 2023 पासून कुणबी नोंदी शोधणे, वंशावळ जुळवणे, प्रमाणपत्र काढून देण्यासाठी व जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी मार्गदर्शन करणे यासाठी सक्रिय कार्य करीत आहे. तसेच हैदराबाद गॅझेटियरमध्ये सांगितलेल्या कुणबी संख्येतील नावांचा शोध घेण्यासाठी जुन्या कागदपत्रांची जुळवाजुळव करीत आहे.हे काम करत असताना सप्टेंबर महिन्यात मनोजदादा जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू होते. यावेळी शासनाच्या प्रतिनिधींनी आमच्याशी संपर्क साधल्यानंतर आम्ही त्यांना न्यायमूर्ती शिंदे समितीचे काम अपूर्ण राहिले असून, आम्हाला कन्नड येथील भूमी अभिलेख कार्यालयातील दस्तांच्या पुनर्तपासणीचे अधिकार द्यावेत, असे सांगितले. त्यांनी ते तात्काळ मान्य केले. आम्ही तिथे तपासणी केली असता अपेक्षेप्रमाणे शेकडो नोंदी आढळून आल्या. अशी परिस्थिती सर्वच तालुक्यांत असल्याचे मनोजदादांना सांगितल्यानंतर दादांनी संपूर्ण महाराष्ट्रात पुनर्तपासणीसाठी शासनाकडे मागणी केली. आणि आता महाराष्ट्रातील संपूर्ण जिल्ह्यांमध्ये कुणबी नोंदींची पुनर्तपासणी होत आहे." - प्रा. चंद्रशेखर शिंदे (अभ्यासक, नाचनवेल - कन्नड)"मी शासकीय कार्यालयातील जुने दस्त, त्यांचा कालखंड, त्यामध्ये असलेली नावे, जुने सर्वे नंबर व नवीन सर्वे नंबर यांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्या समकालीन कालखंडातील जनगणनेच्या दस्तऐवजांमधील व्यक्तींची नावे तंतोतंत जुळत असल्याचे निदर्शनास आणून दिले. हा शोध हैदराबाद गॅझेटियरमध्ये असलेल्या कुणबी आकड्यांमधील व्यक्तींच्या नावांपर्यंत पोहोचण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे."

२० दिवसांपासून होता बेपत्ता; उसाच्या शेतात आढळला, पोलिसांच्या तत्परतेमुळे पत्नीशी पुनर्भेट



दौलताबाद (जावेद अहमद) : राजस्थानमधून भटकत महाराष्ट्रात आलेल्या एका मनोरुग्ण व्यक्तीला दौलताबाद पोलिसांनी माणुसकीचे दर्शन घडवत सुखरूप त्याच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. सुमारे २० दिवसांपासून बेपत्ता असलेली ही व्यक्ती आसगाव शिवारातील एका ऊसाच्या शेतात आढळून आली होती. पोलिसांनी त्याची ओळख पटविण्यासाठी केलेले प्रयत्न, सोशल मीडियाचा वापर आणि नातेवाइकांशी साधलेला संपर्क यामुळे अखेर त्याची पत्नी आणि कुटुंबीयांशी पुनर्भेट घडून आली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबर २०२६ रोजी डायल ११२ बीट मार्शलला आसगाव शिवारातील रामनाथ जाधव यांच्या शेतात ऊसाच्या पिकामध्ये एक अनोळखी व्यक्ती लपून बसल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच डायल ११२ वरील पोलीस कर्मचारी साहेबराव राठोड आणि संदीप मदन पवार यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ऊसाच्या शेतात शोध घेतल्यानंतर संबंधित व्यक्तीला बाहेर काढण्यात आले. तो असंबद्ध बोलत असल्याने आणि मानसिकदृष्ट्या अस्वस्थ दिसत असल्याने पोलिसांनी त्याला दौलताबाद पोलीस ठाण्यात आणले.पत्नीच्या मोबाईल क्रमांकावरून पटली ओळखपोलीस उपनिरीक्षक अर्जित दगडखेड़ आणि पोलीस कर्मचारी खुशालराव पाटील यांनी संबंधित व्यक्तीची चौकशी केली. मात्र, तो व्यवस्थित माहिती देऊ शकत नव्हता. त्याच्या बोलण्यावरून तो राजस्थानमधील असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यानंतर पोलिसांनी राजस्थानमधील झुंझुनू जिल्ह्यातील संबंधित भागाची माहिती मिळविण्यास सुरुवात केली.चौकशीदरम्यान त्याच्या पत्नी एकता कंवर यांचा मोबाईल क्रमांक पोलिसांना मिळाला. पोलिसांनी त्या क्रमांकावर संपर्क साधून संबंधित व्यक्तीचा फोटो पाठविला. फोटो पाहताच पत्नीने आपल्या पतीला ओळखले. शेरसिंग छोगारसिंग शेखावत (वय ४०) असे त्यांचे नाव असून, ते गेल्या सुमारे २० दिवसांपासून बेपत्ता असल्याचे पत्नीने पोलिसांना सांगितले. ते मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असल्याने घरातून बाहेर पडल्यानंतर त्यांचा शोध सुरू होता.२० दिवसांनंतर कुटुंबीयांशी पुनर्भेटमहाराष्ट्रात आपले पती सुखरूप असल्याची माहिती मिळताच पत्नी आणि कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला. त्यानंतर कुटुंबीय दौलताबाद पोलीस ठाण्यात आले. आवश्यक खातरजमा आणि ओळख पटविल्यानंतर पोलिसांनी शेरसिंग यांना त्यांच्या पत्नी एकता कंवर आणि कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. तब्बल २० दिवसांनंतर पतीची भेट झाल्याने कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता.दौलताबाद पोलिसांच्या माणुसकीचे कौतुकपोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक अर्जित दगडखेड़, पोलीस कर्मचारी खुशालराव पाटील, साहेबराव राठोड, सुमेध पवार, संदीप पवार आणि बंडू गोरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.परराज्यातून भटकत आलेल्या मानसिकदृष्ट्या अस्वस्थ व्यक्तीची काळजी घेऊन त्याची ओळख पटविणे आणि त्याला पुन्हा कुटुंबीयांपर्यंत पोहोचविणे, या दौलताबाद पोलिसांच्या संवेदनशील कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ नोव्हेंबर २०२६

लाखो फायनान्स कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात

दुष्काळाच्या नावाखाली आपल्याच माणसांच्या रोजगारावर घाला कशासाठी?राजकीय, सामाजिक संतापजनक वक्तव्यांमुळे लाखो फायनान्स कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. बोलणारे बोलून जातात, पण भोगावं लागतं सामान्य जनतेला! लाखो लोकांचे पोट भरणाऱ्या फायनान्स कंपन्यांवर दुष्काळाचं भांडे फोडून लाखो लोकांचा रोजगार संपण्याची आणि उपासमारीची चिंताजनक चित्रं बघायला मिळत आहे. बोलणारे बोलून जातात. गरजूवंतांच्या मागे लपून बेगरजूही हात धुऊन घेतात. पण फायनान्समध्ये काम करणारी पोरं नेमकी कोण आहेत? ती काय विदेशातून आली आहे का? का पाकिस्तानमधून आली आहे ? हि सगळी आपलीच पोरं आहे. आपल्याच गावातील, आपल्याच तालुक्यातील, आपल्याच जिल्ह्यातील, आपल्याच नात्यातील, आपलाच पाहुणा, नातेवाईक, मित्र, भाऊ, बाप, काका, मामा, पती, दाजी, साला... अशी रक्ताची नाती असलेली ही माणसं आहेत!कुणाचा कुणी, कुणाचा कुणी, आपलाच कुणीतरी जवळचा, आपल्यातलाच एखादा व्यक्ती त्या फायनान्समध्ये काम करतोय, हे बोलणाऱ्यांना कदाचित माहीत नसावं! कदाचित त्या लाखो जीवांची त्यांना किंमत नसावी.मार्केटमध्ये फायनान्सवाल्यांना मारण्याच्या, धमकावण्याच्या आणि गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या मिळत आहेत. या सगळ्या धमक्या फायनान्स कर्मचाऱ्यांच्या जीवावर बेतणाऱ्या आहेत. यात काही लोक खुन्नस म्हणूनही एखाद्याचा जीव घेऊ शकतात. मग त्या जीवाची जबाबदारी कुणाची? फायनान्सवाला भारताचा नागरिक नाही का.? तर आहेच ना ! तोही भारताचा नागरिक आहे. त्यानेही तुम्हाला मतदान केलं आहे. तोही तुमचाच कार्यकर्ता आहे. त्यालाही कुटुंब आहे. बायका-पोरं आहेत. त्याचीही परिस्थिती जेमतेम आहे. त्याच्याही मनात आत्महत्येचा विचार येऊ शकतो. तोही आत्महत्या करू शकतो. मग तो मेल्यावर त्याच्या कुटुंबाचं काय ? आयुष्याचे प्रश्न सोडवायला आत्महत्या हा पर्याय नसतो. फायनान्समध्ये काम करणारा प्रत्येक कर्मचारी दोषी नसतो ! नाहीच !फायनान्समध्ये काम करणं म्हणजे रोज मजुरीवर काम करण्यासारखंच आहे. एखादे-दोन बोटांवर मोजण्याएवढे डोक्यावर पडलेले, माजलेले बोके वसुलीवाले असू शकतात किंवा एखाद्या एजन्सीची लोकं राहू शकतात. त्याबद्दल दुमत नाही. अशां लोकांना तुम्ही समजावलं पाहिजे, धमकावलं पाहिजे, तुमच्या हिशोबाने ते बरोबरही असेल.पण त्यांच्यामुळे बाकी सगळे फायनान्सवाले, बँकवाले आणि वसुलीवाले बदनाम होत आहेत, नामांकित कंपन्यांचे नाव खराब होत आहे. त्याचं काय? त्यांच्यामुळे सगळ्यांनाच भोगावं लागतं आहे. कृपया सगळ्यांना एकाच माळेचे मणी समजू नका. अशा बिकट, कठीण परिस्थितीत त्यांना साथ देण्याऐवजी त्यांच्या जीवाची बोली लावू नका. त्यांनाही न्याय मागण्याचा अधिकार आहे. त्यांनाही आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे. त्यांचीही बाजू शासनाने आणि प्रशासनाने ऐकून घेतली पाहिजे. समजून घेतली पाहिजे. त्यांनाही न्याय मिळाला पाहिजे.कित्येक आपल्या बेरोजगार पोराबाळांना फायनान्सवाल्यांनी नोकरी दिली. त्या नोकरीवर त्यांचं घरदार चालत आहे. अशा या सर्वसामान्य नोकरदारांच्या मागे आपलीच माणसं आपल्याच माणसांच्या हात धुऊन मागे लागली आहेत. यात नोकरदारांची काय चूक आहे ? कर्मचाऱ्यांची मजबुरी समजून घ्या! नोकरदार म्हणजे सांगितलेल्या कामाचा आणि दिलेल्या भाकरीचा असतो. कर्मचाऱ्यांची इच्छा नसतानासुद्धा वरच्या मॅनेजमेंटकडून प्रेशर येत असल्यामुळे नाइलाजाने वसुली करावी लागत आहे. फिल्डवर फिरावं लागतं. व्हिजिट लोकेशन टाकावे लागतं आहे. कस्टमरला फोन करावा लागतो आहे. बॉस लोकांचे तासन्तास होणारे कॉन्फरन्स कॉल, काम झालं नाही तर तुला फुकट पगार देत येणार नाही. तुला कंपनी फुकट पोसणार नाही. तुझ्यासारख्या कर्मचाऱ्याची कंपनीला गरज नाही, अशा प्रकारच्या धमक्या ऐकाव्या लागत आहे. अशा कठोर बोलणाऱ्या आणि वागणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मनमानी नियमांमुळे नोकरी वाचवण्यासाठी नाइलाजाने हे काम करावं लागतं आहे.अशा कामाच्या प्रेशर असलेल्या वातावरणात मजबुरीने काम करावं लागत असल्याचं, पडद्यामागचं हे चित्र बोलणाऱ्यांना माहीत नसतं. त्यामुळे बोलणारा कोणताही विचार न करता, परिस्थिती समजून न घेता, समोर जो दिसेल त्याच्यावर नेम धरून उभा राहतो. त्यांना एवढीच विनंती करायची आहे की, फायनान्स कर्मचाऱ्यांवर दबाव टाकू नका. त्यांना मारण्याच्या धमक्या देऊ नका. त्यांच्यावर सरसकट कारवाई करण्याची भाषा करू नका. बोलणाऱ्यांनी सरळ-सरळ शासनाकडे पीककर्जापुरती मर्यादित कर्जमाफी न मागता, बिनव्याजी मॉरिटोरियम किंवा सरसकट कर्जमाफीचा प्रस्ताव ठेवावा. त्यात मग सर्वच प्रकारची कर्जं घ्या - होम लोन, व्हेईकल लोन, ट्रॅक्टर लोन, पर्सनल लोन, मायक्रो फायनान्स लोन, बचत गट लोन अशा सर्व प्रकारच्या कर्जमाफीचा जी.आर. काढण्याची मागणी करा.एकदा शासनाने बिनव्याजी मॉरिटोरियम किंवा सरसकट कर्जमाफीचा जी.आर. काढून त्याबाबत आरबीआयला आवश्यक ते निर्देश दिले, तर मग प्रॉब्लेमच सॉल्व्ह झाला समजा !कोणताही बँकवाला, फायनान्सवाला किंवा वसुलीवाला कर्जदाराच्या दाराशी जाणार नाही. कर्जदारांना कोणताही फायनान्सवाला किंवा बँकवाला बिनकामी फोन करणार नाही. कुठल्याही शेतकऱ्याला किंवा कर्जदाराला बकवाल्यांचा,फायनान्सवाल्यांचा त्रास होणार नाही. आणि फायनान्सवाल्यांनाही इतर लोकांचा त्रास होणार नाही.कोरोना काळातील मॉरिटोरियमचा अनुभव विसरू नका! महामारीच्या कोरोना काळातही अशा प्रकारे मॉरिटोरियम दिलं होतं. पण नंतर मॉरिटोरियमच्या व्याजाची रक्कम अव्वाच्या सव्वा लावण्यात आली होती. मॉरिटोरियम संपल्यानंतर हप्त्यांची रक्कम डबल-ट्रिपल वाढवण्यात आली. त्यावेळेला न्यायालयानेसुद्धा ग्राहकांना न्याय मिळवून दिला नाही. त्यावेळेलाही बोलणारे बोलून गेले. पण भोगावं मात्र सर्वसामान्य जनतेलाच लागलं.आता तसं पुन्हा होता कामा नये. आरबीआयला मॉरिटोरियम द्यायचं असेल तर बिनव्याजी मॉरिटोरियम द्यावं. तसे शासनाने जी.आर.मध्ये नमूद करावं. मॉरिटोरियम वर्षभर द्या, नाहीतर दोन वर्षं द्या. हवा तेवढा काळ कर्जाची मुदत वाढवून द्या. त्यात कर्जदारांचं नुकसान व्हायला नको. फायनान्सवाल्यांच्या नोकऱ्या जायला नकोत. फायनान्सवाल्यांच्या पगारातील एकही रुपया कपात व्हायला नको.अशा प्रकारे मार्ग काढा. नाहीतर सर्व प्रकारची कर्जं, होम लोन, व्हेईकल लोन ते पर्सनल लोनपर्यंतची सर्व कर्जं सरसकट कर्जमाफीत घ्या. तेव्हा कुठे दुष्काळावर मात करण्यासाठी हातभार लागेल. यामुळे आपापसांत चिघळणारे वाद होण्याआधीच संपतील. कोणताही वाद न होता सर्वांना दुष्काळाचा सामना करता येईल.अशा प्रकारे आपल्या साऱ्यांना मिळून दुष्काळ संपवण्याच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न करता येईल.दुष्काळावर बोलण्याबरोबर निसर्गही वाचवा!या पुढे जाऊन विचार करावा लागेल. आपल्याकडे उरलेलं पाणी कसं साठवता येईल, काटकसरीने कसं वापरता येईल, याकडे लक्ष द्यावं लागेल. पुढे पाऊस कसा पडेल? निसर्ग कसा वाचवता येईल? जंगलं कशी वाचवता येतील? याचंही नियोजन आतापासूनच करावं लागेल. तेव्हा कुठे पुढच्या वर्षी पाऊस पडेलच त्याचीही शा

दलित अत्याचार : सामाजिक न्यायावर प्रश्नचिन्ह

श्वती नाही."यावर्षी आलो नाही, पुढच्या वर्षी येईल, पावसानं असा काही बॉण्ड करून दिला नाही.मी पुन्हा येईल,पाऊस असा काही म्हणला नाही..."हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा डोक्यात ठेवून काम करता येईल. महामारीत केलं तसं आताही करता येईल. महत्त्वाचे मुद्दे बाजूला राहिले. दुसरंच भलत-सलत चालू आहे.एक घाव दोन तुकडे करण्याऐवजी आपण वेगळ्याच मुद्द्यावर एकमेकांशी भांडतो आहे.दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असूनही आपण निसर्गाला विकत आहो. त्यावर कुणी बोलत नाही. जनतेला वेगळ्याच विषयाकडे भटकवत आहे. आपण सर्वांनी जरा जल, जंगल, जमीन वाचवण्याकडेही लक्ष दिलं पाहिजे.अशा या दुष्काळात कुठल्याच फायनान्स कंपनीने कोणत्याच कर्मचाऱ्याला नोकरीवरून काढू नये. त्याचा पगार कमी करू नये किंवा बंद करू नये.कर्जदारांना बिनव्याजी मॉरिटोरियम द्या किंवा सरसकट कर्जमाफी द्या.शासनाने जी.आर. देऊन आरबीआयला आवश्यक ते निर्देश दिले, तर सगळे प्रश्न जागेवर सुटतील.अशा रास्त मागण्या राजकीय व्यक्ती असतील, सामाजिक व्यक्ती असतील, लोकनेते असतील, त्यांनी शासनदरबारी मांडाव्यात. सत्ताधारी लोकांनीसुद्धा एका बाजूने विचार न करता दोन्ही बाजूंनी विचार करावा.फक्त फायनान्सवाल्यांना दोषी न मानता त्यांची मजबुरी समजून घ्यावी. फायनान्सवाल्यांची, आपल्याच माणसांची रोजीरोटी न हिसकवता, दोन्ही बाजूंनी विचार करावा. ही नम्र विनंती.अति महत्त्वाचं म्हणजे उन्हाळ्यात महागाईचा चटका लगेच कमी करावा. शेतीमालाला भाव द्यावा. इतरांचे रोजगार टिकून राहतील अशा योजना अमलात आणाव्यात. अशा प्रकारे चहूबाजूने समतोल राखावा. तेव्हा कुठे या दुष्काळी झळा सर्वसामान्य माणसालासुद्धा कमी जाणवतील.कर्ज भरण्याची ऐपत असणाऱ्यांनी पुढे यावं!महत्त्वाचे म्हणजे, जो कर्जदार आज कर्ज भरण्यास सक्षम आहे, ज्या कर्जदाराची कर्ज भरण्याची ऐपत आहे, तो अगदी सहजपणे आपलं कर्ज निल करू शकतो किंवा भरू शकतो. अशा कर्जदारांनी मागे न लपता पुढे आलं पाहिजे.कर्ज न भरू शकण्याच्या परिस्थितीने हलाखीला आलेल्या कर्जदार भावाच्या मागे न लपता, आपल्याच भावाचा फायदा होईल, त्याचं कर्ज माफ होईल, असा विचार केला पाहिजे. पण आपण तसं न करता, परिस्थितीचा फायदा घेत आहोत. आज कर्ज भरू न शकणाऱ्याच्या मागे कर्ज भरू शकणारा लपला आहे. म्हणूनच आज फायनान्स आणि बँकांचे हप्ते थकले आहेत. त्यामुळे सरकारलाही सरसकट कर्जमाफी देताना अडचणी येतात. अडचण मोजक्या लोकांची आहे आणि मोजक्या लोकांना सरसकट कर्जमाफी देण्यापेक्षा खऱ्या गरजूवंतांना मदत करण्यासाठी आपलं सरकार सक्षम आहे. त्यामुळे आपल्या देशात खरा गरजूवंत वंचित राहून जातो. थकबाकी असणाऱ्या कर्जदाराने, कर्ज न भरणाऱ्याचा फायदा घेऊन माझं कर्ज माफ होईल, या स्वार्थी उद्देशाने खरोखर परिस्थिती खालावलेल्या कर्जदारांच्या मागे लपू नये. ज्या लोकांची खरोखर सद्यस्थितीत कर्ज भरण्याची परिस्थिती नाहीये, अशा लोकांना बँकवाले आणि फायनान्सवाले समजून घेण्यास तयार आहेत. त्यांना मदत करण्यासही तयार आहेत.पण यात खरा गरजूवंत लाभार्थी मागे राहून जातो. आणि त्या गरजूवंताच्या परिस्थितीचा फायदा ऐपत असणारा कर्जदार घेतो. दुष्काळी परिस्थितीत अशी स्थिती निर्माण झाली आहे. ऐपत असणाऱ्या कर्जदारांच्या थकबाकीमुळे फायनान्स कंपन्या आणि बँका बंद पडायला लागल्या आहेत. याच फायनान्स आणि बँकांमध्ये काम करणारे आपल्याच गावातील, घरचे, नात्यातले, कार्यकर्ते आणि कर्मचारी बेरोजगार होतील. उपाशी मरतील, तेही फाशी घेऊन मरतील, याकडे कुणाचं लक्षच नाही. त्यांच्याविषयी कुणाला काही घेणं-देणं नाही. शासनाने दोन्ही बाजूंचा विचार करावा! आदरणीय शासनाला, शासनकर्त्यांना, सत्ताधाऱ्यांना, राजकीय नेत्यांना, सामाजिक कार्यकर्त्यांना, लोकनेत्यांना तसेच सर्वसामान्य जनतेला विनंती आहे की, सगळ्यांना सारखा न्याय द्या.महत्त्वाचे मुद्दे आणि शासनाकडे मागण्या१) फायनान्स कर्मचाऱ्यांना धमकावू नये.खालच्या लेव्हलला कुठल्याच फायनान्स कर्मचाऱ्यांना धमकावू नये. वरच्या लेव्हलला सरळ-सरळ जी.आर. काढून आरबीआयच्या अंतर्गत सर्व बँकिंग आणि फायनान्स संस्थांना वसुलीबाबत आवश्यक ते आदेश देण्यात यावेत.२) कर्जदारांना बिनव्याजी मॉरिटोरियम किंवा सरसकट कर्जमाफी द्यावी.दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन कर्जदारांना बिनव्याजी मॉरिटोरियम द्यावं किंवा सर्व प्रकारच्या कर्जांची सरसकट कर्जमाफी करावी.३) महागाईला लगेच झटकून टाकावं.सर्वसामान्य जनतेला महागाईच्या चटक्यांपासून दिलासा द्यावा.४) शेतीमालाला चांगला भाव द्यावा.शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य आणि हमीभाव मिळवून द्यावा.५) रोजगार टिकवून ठेवावेत.दुष्काळी परिस्थितीत कोणत्याही कर्मचाऱ्याचा, मग तो शासकीय असो किंवा खासगी, विशेषतः बँक आणि फायनान्समधील कर्मचारी असो, त्याचा पगार कपात न करता नियमित पगारासह नोकरी चालू ठेवावी. कोणत्याही कर्मचाऱ्याला सक्तीच्या वसुलीचं प्रेशर करु नये.कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या आणि कर्जदारांचे हित दोन्ही जपा!कर्ज भरू शकणाऱ्या कर्जदाराला शक्य असल्यास छोट्या-छोट्या हप्त्यांत थकीत रक्कम भरण्यास सांगावं.बऱ्याच लोकांचं दुष्काळा अगोदरपासूनच अनेक महिन्यांचं कर्ज थकीत आहे. आता ते खाते NPA झालं आहे. सध्या चालू OD कस्टमर असलेल्या कर्जदारांच्या थकीत रकमेवर (OD) परडे दंड चार्ज चालू आहे. तोही चार्ज न लावण्याचा निर्णय घ्यावा. त्याचबरोबर थकीत कर्जामुळे आणि NPA टॅगमुळे सिबिल खराब झालेल्या किंवा खराब होत असलेल्या ग्राहकांचे, कर्जदारांचे सिबिलही खराब होऊ नये, असा निर्णय शासनाने जी.आर.मध्ये नमूद करावा.समस्त फायनान्स कर्मचाऱ्यांच्या वतीने मी शासनदरबारी आदरणीय शासनाला विनंती करतो की, दुष्काळी परिस्थितीत कर्जदारांना दिलासा द्या; पण त्याचवेळी फायनान्स कर्मचाऱ्यांच्याही रोजीरोटीचा विचार करा.शेतकरी वाचला पाहिजे, कर्जदार वाचला पाहिजे, फायनान्स कर्मचाऱ्यांचाही रोजगार टिकला पाहिजे.एकमेकांच्या विरोधात उभं राहण्यापेक्षा एकमेकांना समजून घेऊन दुष्काळावर मात करण्यासाठी एकत्र आलं पाहिजे.जल, जंगल, जमीन वाचवा !शेतकरी वाचवा ! रोजगार वाचवा !सर्वसामान्य माणूस वाचवा !हीच शासनाकडे नम्र विनंती.

- लक्ष्मण वाल्डे
88886 06068

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ नोव्हेंबर २०२६

दलित अत्याचार : सामाजिक न्यायावर प्रश्नचिन्ह

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा, स्वातंत्र्याचा, न्यायाचा आणि प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार दिला आहे. जात, धर्म, लिंग, भाषा किंवा सामाजिक स्थान यांच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाऊ नये, ही संविधानाची मूलभूत भूमिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून शतकानुशतके सामाजिक विषमता आणि जातीय शोषण सहन करणाऱ्या वंचित समाजाला न्याय, समान संधी आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. मात्र, संविधानाने दिलेले हे अधिकार प्रत्यक्ष सामाजिक जीवनात कितपत उतरले आहेत, हा प्रश्न आजही गंभीरपणे उपस्थित होतो. विशेषतः संविधान दिनाच्या निमित्ताने आपण संविधानाचा गौरव करतो. दलित, आदिवासी, वंचित आणि उपेक्षित समाजाच्या उन्नतीसाठी संविधानाने दिलेल्या योगदानाचे गुणगान गातो. संविधानामुळे या समाजाला मिळालेल्या अधिकारांची चर्चा करतो. परंतु ज्या भूमीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेचा विचार रुजवला, त्याच महाराष्ट्रात दलितांवर जातीय अन्याय आणि अत्याचाराच्या घटना घडत असतील, तर यापेक्षा मोठी शोकांतिका कोणती? संविधानाचा गौरव आणि सामाजिक वास्तव यांतील ही दरी आपल्या लोकशाहीसमोर अनेक प्रश्न उभे करते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे रोहित पठारे या तरुणावर झालेल्या कथित जातीय हल्ल्याची घटना याच वास्तवाकडे लक्ष वेधते. उपलब्ध वृत्तांनुसार, गणेशोत्सव मंडळांशी संबंधित वादातून सुरू झालेल्या संघर्षाला जातीय स्वरूप प्राप्त झाले आणि रोहित यांच्यावर अमानुष हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात जातिवाचक शिवीगाळ आणि मारहाणीचे आरोप असून, त्यांच्या पत्नीवरही अत्याचार झाल्याचे वृत्त आहे. गंभीर जखमी झालेल्या रोहित यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना केवळ दोन गटांतील संघर्ष म्हणून पाहता येणार नाही. तिच्या मुळाशी जातीय वर्चस्वाची मानसिकता आणि सामाजिक विषमतेचे वास्तव आहे. भारतीय समाजात दलितांवरील अत्याचार केवळ प्रत्यक्ष हिंसेच्या स्वरूपातच घडतात असे नाही. अनेकदा ते अदृश्य, अप्रत्यक्ष आणि संस्थात्मक स्वरूपातही अनुभवास येतात. सामाजिक बहिष्कार, सार्वजनिक ठिकाणी अपमान, जातीय पूर्वग्रह, शिक्षण आणि रोजगारातील भेदभाव, राजकीय सहभागाला विरोध, सामाजिक प्रतिष्ठा नाकारणे अशा अनेक माध्यमांतून जातीय वर्चस्व व्यक्त होत असते. दलित समाजाचा राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील सहभाग वाढत असताना काही ठिकाणी या सहभागाला विरोध किंवा प्रतिक्रियात्मक हिंसेचा सामना करावा लागतो. अर्थात, सहभाग वाढणे आणि अत्याचार वाढणे यांच्यात सरळ कारणसंबंध गृहीत धरता येणार नाही; मात्र दलितांच्या स्वाभिमानपूर्ण अस्तित्वाला आणि समान हक्कांच्या दाव्याला विरोध करणारी मानसिकता आजही अनेक ठिकाणी दिसून येते. या परिस्थितीत राज्ययंत्रणेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जातीय अत्याचाराच्या घटनांमध्ये पोलिसांनी निष्पक्षपणे आणि तत्परतेने कारवाई करणे अपेक्षित असते. मात्र, अनेकदा तक्रारींची गांभीर्याने दखल न घेणे, पीडितांच्या कुटुंबीयांना न्यायासाठी संघर्ष करावा लागणे, आरोपींना पाठीशी घातले जात असल्याची भावना निर्माण होणे अशा बाबी समोर येतात. 'चलता है' ही प्रवृत्ती आणि 'दलितांचेच काहीतरी चुकले असेल' अशा प्रकारची पूर्वग्रहदूषित मानसिकता न्यायप्रक्रियेला बाधा आणते. एखाद्या घटनेत पीडित व्यक्तीच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित करण्याऐवजी अत्याचाराच्या मुळाशी असलेल्या जातीय मानसिकतेचा शोध घेणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, निष्पक्ष तपास आणि पीडितांना संरक्षण ही राज्याची घटनात्मक जबाबदारी आहे. या प्रश्नाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक एकजुटीचा अभाव. दलित समाज इतर वंचित, शोषित आणि पीडित घटकांवर अन्याय होत असताना त्यांच्या समर्थनार्थ पुढे येतो. सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांच्या बाजूने भूमिका घेतो. मात्र, दलित समाजावर अत्याचार होतात तेव्हा व्यापक बहुजन समाजातील सर्व घटक त्याच ताकदीने आणि एकजुटीने त्याच्या पाठीशी उभे राहतातच असे नाही. ही बाब सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने चिंताजनक आहे. अन्याय कोणावरही झाला तरी त्याविरोधात उभे राहणे ही केवळ एका समाजाची जबाबदारी नसून प्रत्येक संवेदनशील नागरिकाचे कर्तव्य आहे. सामाजिक न्यायाची लढाई परस्परांच्या वेदनांशी जोडली गेली, तरच बंधुतेचे मूल्य प्रत्यक्षात येऊ शकते. भारतीय समाजातील जातीय हिंसेचा हा प्रश्न नवीन नाही. खैरलांजी (२००६), मिर्चपूर (२०१०), भीमा-कोरेगाव (२०१८), हाथरस (२०२०) आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या घटनांनी जातीय भेदभाव आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाचे प्रश्न पुन्हा पुन्हा ऐरणीवर आणले आहेत. या घटनांमध्ये परिस्थिती आणि स्वरूप वेगवेगळे असले, तरी त्यातून सामाजिक विषमतेचे वास्तव अधोरेखित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेची केलेली चिकित्सा आजही समकालीन समाज समजून घेण्यासाठी महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, जातिव्यवस्था ही केवळ श्रमविभागणी नसून श्रमिकांची विभागणी करणारी, जन्माच्या आधारावर सामाजिक दर्जा निश्चित करणारी आणि श्रेणीबद्ध विषमता टिकवून ठेवणारी व्यवस्था आहे. **नोंदवलेले गुन्हे:** महाराष्ट्रात अनुसूचित जातींवरील अत्याचारांचे दरवर्षी सरासरी **२,५०० ते २,८००** गुन्हे नोंदवले जातात. देशातील एकूण गुन्ह्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा वाटा सुमारे **४.५% ते ५%** इतका आहे. **राज्यातील गुन्हा दर:** महाराष्ट्राचा गुन्हा दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा (२७.७) कमी असून, राज्यात प्रति १ लाख अनुसूचित जातीच्या लोकसंख्येमागे हा दर सुमारे **१९ ते २१** च्या आसपास राहिला आहे. **प्रलंबित प्रकरणे व दोषसिद्धी:** राज्यात दरवर्षी ११,००० हून अधिक खटले न्यायालयात प्रलंबित राहतात. महाराष्ट्रातील या गुन्ह्यांमधील दोषसिद्धी दर राष्ट्रीय सरासरीपेक्षाही कमी (सुमारे १०% ते १२% दरम्यान) राहिला आहे, ज्यामध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष न्यायालयांची (Exclusive Special Courts) संख्या वाढवण्याची मागणी सातत्याने केली जाते. **जातीय** अत्याचारांचा प्रश्न स्त्रियांच्या सुरक्षिततेशीही जोडलेला आहे. अनेक घटनांमध्ये दलित स्त्रियांवरील हिंसा ही केवळ व्यक्तीविरोधातील हिंसा राहत नाही, तर संपूर्ण समाजाला अपमानित आणि भयभीत करण्याचे माध्यम बनते. त्यामुळे जात, वर्ग आणि लिंग यांच्या परस्परसंबंधातून या हिंसेचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. आज गरज आहे ती केवळ अत्याचारानंतर निषेध नोंदवण्याची नाही, तर जातीय भेदभावाला पोषक असलेल्या सामाजिक मानसिकतेत परिवर्तन घडवून आणण्याची. शिक्षण, संविधानिक जाणीव, सामाजिक प्रबोधन, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्व वंचित घटकांमधील एकजूट या माध्यमांतूनच या प्रश्नाला सामोरे जाता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित सामाजिक लोकशाहीचा आग्रह धरला. त्यांच्या मते, राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर तिचा आधार सामाजिक लोकशाही असला पाहिजे. आज संविधान दिन साजरा करताना या विचारांचे केवळ स्मरण करून चालणार नाही, तर ते आपल्या आचरणात उतरवणे आवश्यक आहे. संविधान किती श्रेष्ठ आहे, यापेक्षा संविधानाने दिलेली मूल्ये आपण समाजजीवनात किती स्वीकारली आहेत, यावर त्याचे यश अवलंबून आहे. दलितांवरील अत्याचार थांबवणे ही केवळ दलित समाजाची मागणी नाही; ती भारतीय लोकशाहीच्या विश्वासार्हतेची आणि संविधानिक मूल्यांच्या प्रतिष्ठेची कसोटी आहे. सामाजिक न्याय म्हणजे केवळ आरक्षण, कायदे आणि कल्याणकारी योजना नव्हेत, तर प्रत्येक व्यक्तीला जातीय भेदभावाविना सन्मानाने जगता येईल अशी समाजव्यवस्था निर्माण करणे होय. संविधानाचा खरा गौरव तेव्हाच होईल, जेव्हा संविधानकर्त्यांच्या विचारांची भूमी असलेल्या महाराष्ट्रासह संपूर्ण देशात कोणत्याही व्यक्तीला तिच्या जातीमुळे अपमान, हिंसा किंवा अन्याय सहन करावा लागणार नाही. जातीय हिंसेमागे केवळ व्यक्तींचा राग किंवा संघर्ष नसतो; अनेकदा त्यामागे ऐतिहासिक वर्चस्वाची मानसिकता कार्यरत असते. वंचित समाजातील व्यक्तीने शिक्षण, आर्थिक प्रगती आणि सामाजिक जागृतीच्या माध्यमातून स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, स्वतःच्या अधिकारांची जाणीव व्यक्त केली किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, तर प्रस्थापित जातीय मानसिकतेला ते आव्हान वाटू शकते. अशा वेळी हिंसा ही केवळ प्रतिशोधाची कृती न राहता संबंधित व्यक्तीला तिची तथाकथित सामाजिक जागा दाखवण्याचे माध्यम बनते. या हिंसेचा स्त्रियांशी असलेला संबंधही दुर्लक्षित करता येणार नाही. रोहित यांच्या पत्नीवर झालेला हल्ला हा केवळ वैयक्तिक हिंसेचा भाग नसून जातीय वर्चस्व आणि पुरुषसत्ताक मानसिकता यांच्या परस्परसंबंधाचे निदर्शक आहे. जातीय संघर्षांमध्ये स्त्रियांच्या शरीराचा वापर अनेकदा संपूर्ण कुटुंबाचा आणि समुदायाचा अपमान करण्यासाठी केला जातो. त्यामुळे दलित अत्याचाराच्या प्रश्नाकडे जात आणि लिंगभाव या दोन्ही अंगांनी पाहण्याची आवश्यकता आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार दिला आहे. अस्पृश्यता नष्ट करण्याची तरतूद, कायद्यापुढील समानता आणि सामाजिक न्यायाची बांधिलकी ही संविधानिक लोकशाहीची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. मात्र, संविधानिक समानता आणि प्रत्यक्ष सामाजिक व्यवहार यांच्यात आजही मोठी दरी दिसून येते. संविधानाने व्यक्तीला समान नागरिकत्व दिले असले, तरी समाजातील जातीय उतरंड अनेकदा त्या समानतेला नाकारते. परिणामी, राजकीय लोकशाही अस्तित्वात असतानाही सामाजिक लोकशाहीचे उद्दिष्ट अपूर्ण राहते. डॉ. आंबेडकरांनी राजकीय लोकशाही टिकवायची असेल, तर तिचा आधार सामाजिक लोकशाही असला पाहिजे, असे स्पष्ट केले होते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा सामाजिक जीवनात स्वीकार झाल्याशिवाय लोकशाही केवळ संस्थात्मक आणि औपचारिक स्वरूपात राहण्याचा धोका असतो. रोहित पठारे यांच्यावरील अत्याचार ही याच विरोधाभासाची जाणीव करून देणारी घटना आहे. जातीय अत्याचाराच्या घटनांमध्ये राज्यसंस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पोलिसांची निष्पक्षता, तक्रारींची नोंद, तपासाची विश्वासार्हता, पीडित कुटुंबाचे संरक्षण आणि दोषींवरील प्रभावी कारवाई या बाबींवर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास अवलंबून असतो. रोहित यांच्यावर ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या हल्ल्यानंतर ३ नोव्हेंबर रोजी त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात २६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे आणि दहा आरोपींना ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. मात्र, न्यायासाठी त्यांच्या आईला पोलीस ठाण्यात स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून घेण्याचा प्रयत्न करावा लागणे, ही बाब राज्याच्या यंत्रणेसमोरील गंभीर प्रश्न अधोरेखित करते. राज्याची जबाबदारी केवळ गुन्हा घडल्यानंतर आरोपींना अटक करण्यापुरती मर्यादित नसते. जातीय हिंसा रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, पीडितांना संरक्षण देणे, निष्पक्ष तपास करणे आणि न्यायप्रक्रिया प्रभावीपणे पूर्ण करणे ही त्याची संविधानिक जबाबदारी आहे. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असतानाही अशा घटना घडत असतील, तर कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचा प्रश्न उपस्थित होतो. दलित अत्याचाराच्या घटनांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहून चालणार नाही. त्यामागील जातीय मानसिकता, सामाजिक वर्चस्व, असमान सत्तासंबंध आणि संस्थात्मक उदासीनता यांचीही चिकित्सा आवश्यक आहे. जातीय हिंसेचा निषेध करणे ही केवळ दलित समाजाची जबाबदारी नसून प्रत्येक लोकशाहीवादी आणि संवेदनशील नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. रोहित पठारे यांची हत्या आपल्याला एक मूलभूत प्रश्न विचारते : संविधानाने दिलेली समानता प्रत्यक्ष समाजजीवनात कधी उतरवणार? सामाजिक न्याय म्हणजे केवळ आरक्षण, कायदे आणि सरकारी योजनांची अंमलबजावणी नव्हे; तर प्रत्येक व्यक्तीला जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक पार्श्वभूमीचा विचार न करता सन्मानाने जगण्याची हमी देणारी सामाजिक परिस्थिती निर्माण करणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातिव्यवस्थेच्या उच्चाटनाचे स्वप्न प्रत्यक्षात आणायचे असेल, तर कायद्याच्या अंमलबजावणीबरोबरच समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन घडवावे लागेल. अन्यथा संविधानातील समतेची मूल्ये आणि समाजातील विषमतेचे वास्तव यांच्यातील संघर्ष कायम राहील. रोहित पठारे यांच्यासारख्या तरुणांचा बळी जाणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नाही, तर भारतीय लोकशाहीसमोरील नैतिक आणि सामाजिक आव्हान आहे. माणसाची ओळख त्याच्या जातीने नव्हे, तर त्याच्या मानवी अस्तित्वाने आणि प्रतिष्ठेने निश्चित होईल, तेव्हाच सामाजिक न्यायाच्या दिशेने आपली वाटचाल अर्थपूर्ण ठरेल.

प्रा.प्रियदर्शन भवरे,
समाजशास्त्र विभाग,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना